O/c माहिती अधिकार.

माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- २८८८ दिनांक :- ३०-८-२४

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/४०४८ दि १४/०८/२०२४

१. अपिलकर्ता
श्री.संदीप पवार
राहणार :- पर्ल रेसिडेन्सी फलॅट क्र. ०८,
सर्वे क्र. ३६/३ई/२, गोकुळनगर(स्वामी समर्थ नगर ),
चितळे डेअरी शेजारी, कात्रज – कोंढवा रोड,
कात्रज, पुणे ४११०४६

२. श्री. विजय नेवसे , जन माहिती अधिकारी तथा,
सहाय्यक उद्यान अधिक्षक, वृक्ष प्राधिकरण विभाग
पुणे महानगरपालिका.

श्री. संदीप पवार
विरूध्द
श्री. विजय नेवसे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक, पुणे महानगरपालिका.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री. विजय नेवसे यांचा माहिती अधिकार अर्ज आ.क्र. २०२९ दिनांक १८/०६/२०२४ रोजी कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त झाला. सदर अर्जात उद्यान विभागाकडील कलम ४ (ख ) मधील १७ मुद्यांची माहिती मिळणे बाबत केलेल्या माहिती अधिकार अर्जातील माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जाची माहिती उपलब्ध करून न दिल्यामुळे जा.क्र. २४८९ दि. दि. १२/०८/२०२४ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १८/०६/२०२४ | १८/०७/२०२४ | उत्तर दिले नाही | निरंक | उत्तर दिले नाही |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री. संदीप पवार यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे– ''अर्जामधील माहिती देण्याची मुदत संपूनही माहिती न मिळाल्याने सदरचे अपील ''

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| १८/०८/२०२४ | १४/०८/२०२४ | होय | - | ३०/०८/२०२४ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :– दि. ३०/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता

सुनावणीस अपिलकर्ता :– उपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :– उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | उद्यान विभागाकडील कलम ४ (ख ) मधील १७ मुद्यांची माहिती मिळणे बाबत केलेल्या माहिती अधिकार अर्जातील माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. | नाही.<br>सदर अर्जांची माहिती उपलब्ध करून न दिल्यामुळे जा.क्र. २४८९ दि. दि. १२/०८/२०२४ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले. |

**<u>विवेचन</u>**

माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी यांनी माहिती उपलब्ध करून दिली नाही म्हणून अपील दाखल केल्याचे सांगितले यावर जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता सदर अर्जात विचारले प्रमाणे उद्यान विभागाकडील कलम ४ (ख) मधील १७ मुद्यांची माहिती मिळणे बाबत केलेल्या अर्जातील माहिती तयार करणेचे कामकाज चालू असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उद्यान अधीक्षक यांनी सांगितले. सदर ची माहिती उपलब्ध झाल्यावर अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगितले.

**–: आदेश :–**

जन माहिती अधिकारी तथा उद्यान अधीक्षक श्री. विजय नेवसे यांनी अर्जदार यांनी माहिती अधिकार अर्जात मागणी केले नुसार अर्जदारास कलम ४ (ख) मधील १७ मुद्यांची माहिती तात्काळ विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी व संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल आमचेकडे सादर करावा.

(हेमंत मा. किरूळकर)
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाणः ३०/०८/२०२४ ,पुणे.

टीप :– १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.